# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १७१
## सभावृत्तांत

दिनांक- १.०६.२०१० वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १.०६.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१.मा.जगदीश शंकर शेट्टी
२.मा.रामदास तानाजी कुंभार
३.मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
४.मा.थोरात एकनाथ दादा

याशिवाय मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्यांनी मंगळवार दिनांक ८/०६/२०१० रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकुब केली.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १७०
सभावृत्तांत
(दि.१.०६.१० ची तहकुब सभा)

दिनांक- ८.०६.२०१० वेळ - दुपारी २.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची मंगळवार दिनांक १.०६.२०१० ची तहकूब सभा दि.८.६.२०१० रोजी दु.२.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.जगदीश शंकर शेट्टी
३. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
४. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
५. मा.रामदास तानाजी कुंभार
६. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
७. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
८. मा.सौ.सुलोचना बबन बढे
९. मा.सुमनताई मधुकर पवळे
१०. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
११. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
१२.मा.तानाजी विठ्ठल खाडे
१३.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
१४.मा.गावडे जयश्री वसंत
१५.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

---------------------

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.देशमुख, मा.गायकवाड,मा.पवार, मा.गावडे,मा.भोसेकर-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक, मा.भोसले-प्र.मुख्यलेखापाल,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.चिंचवडे, मा.जाधव, मा.कुदळे, मा.पाटील,मा.इंगळे,मा.निकम,मा.ढगे,मा.थोरात,मा.दुधेकर, मा.सवणे, मा.बनकर,मा.साळवी,मा.चव्हाण-कार्य.अभियंता,मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.जगताप-समाजविकास अधिकारी,मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी,मा.कुलकर्णी-सह व्यवस्थापक संचालक (पी.एम.पी.एम.एल.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

दिनांक २५.५.२०१० रोजी (दु. ३:०० व ४:००) झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१८ विषय क्रमांक- १
दिनांक- ८.०६.२०१० विभाग-प्रशासन
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/४५६/१० दि.१३/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

श्री.अजय जनार्दन सुर्यवंशी यांना महापालिके मध्ये कायदा सल्लागार या पदावर ६ महिने कालावधीसाठी कोणतेही आर्थिक लाभ व सोयीसुविधा न देता फक्त र.रू.२५,०००/- [र.रू.पंचवीस हजार] मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मान्यता देण्याची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी ॲड.सुर्यवंशी यांस ३ महिने कालावधी करीता या पुर्वीच्या सर्व सुविधांसह मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२१९ विषय क्रमांक- २
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- संगणक
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/९/कावि/ ४९४ /१० दि.२६/०४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य कार्यालयातील विविध विभागांसाठी ISM Office NT ५० Users Upgrade करणे कामीची तातडीची गरज विचारात घेता निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने कामकाज करून घेणे आवश्यक असल्याने सदरचे ISM Office NT ५० Users Upgrade १ नग मे.Data Care Corporation, Pune-०४. यांचेकडून दुरुस्ती करणेस व येणाऱ्या र.रू.१०,७९१/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२२० विषय क्रमांक- ३
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/०९ दि.१८/११/१०
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४०
विषय :- मनपा जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण,परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाबाबत..

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२२१ विषय क्रमांक- ४
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:- १) मा.गणेश भोंडवे, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४२
विषय :- व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणेबाबत..

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२२२ विषय क्रमांक- ५
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- क्रिडा
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- १) मा.गणेश भोंडवे,मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४३

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मनपा परिसरात महापौर चषक जिल्हास्तरीय क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२२३ विषय क्रमांक- ६
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था /नि/२ब/ कावि/ १३८/ २०१० दि.११/५/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.६० बळवंतनगर मधील रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,२३७/- [र.रू.एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे सदोतीस] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,५८१/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार पाचशे एक्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२२४ विषय क्रमांक- ७
दिनांक- ८.०६.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था /नि/२ब/ कावि/ १३९/ २०१० दि.११/५/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६० चिंचवडेनगर मधील उर्वरीत रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,५८४/- [र.रू. एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार पाचशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,८६३/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार आठशे त्रेसष्ट] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-११२२५ विषय क्रमांक- ८
दिनांक- ८.०६.२०१०
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- १) मा.शकुंतला धराडे,मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव..
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमास प्रति महिला लाभार्थी प्रति दिन र.रू.१००/- या प्रमाणे दोन दिवसीय कार्यक्रम राबविणेस अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मागणी करणेत आली असली तरी नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बचतगटांना बचतगट संघटन, बचतगट रेकॉड पध्दती,अकाउन्टींग, बँकेचे व्यवहार, बचतगट सक्षमीकरण, बचतगट उद्योजकता या विषयीची माहिती ही दोन दिवसीय कार्यक्रमांमध्ये अपुरी होत असल्याने सदरचे प्रशिक्षण हे तीन दिवसीय करण्यात यावे. तसेच यापुर्वी दोन दिवसीय प्रशिक्षण दिलेल्या बचतगटांना देखील वाढीव एक दिवसीय प्रशिक्षण देण्यात यावे. सदरचे प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांनी चांगल्या प्रकारे राबविले असल्याने त्यांना सदरचे प्रशिक्षण राबविणेस ३१ मार्च २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यास व प्रति दिन प्रति महिला रु.१००/- याप्रमाणे होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ११२२६ विषय क्रमांक- ९
दिनांक- ८.०६.२०१०
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- १) मा.सुषमा गावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या ३ वर्षांपासून चांगल्याप्रकारे राबवित असल्या कारणाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मागणी करणेत आली आहे. नागरवस्ती विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांसाठी दरवर्षी विविध व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. हे व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम महिलांसाठी अतिशय उपयुक्त असतात. परंतु या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर वैयक्तीक एका महिलेला व्यवसाय उभारणीसाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून या वर्षी व्यवसाय प्रशिक्षण हे शहरातील सर्व महिलांसाठी न राबविता फक्त बचतगटांसाठी राबविण्यात यावे. बचत गटांसाठी राबवितांना सुध्दा प्रत्येक बचतगटाला फक्त प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील पर्सनॅलीटी डेव्हलपमेंट हा एक कोर्स प्रत्येक बचतगटाला बंधनकारक करण्यात यावा व दुसरा कोर्स बचतगटानेच त्यांना व्यवसाय करता येईल असा निवडावा असे दोनच कोर्सचे प्रशिक्षण प्रत्येक बचतगटाला बंधनकारक करण्यात यावे. सदरील कोर्सेस अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने बचतगट ठरवतील त्याप्रमाणे त्यांच्या सोयीच्या ठिकाणी व ते ठरवतील त्या वेळेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. संस्थेने प्रपत्र अ मध्ये दिलेले ट्रेड कालावधी व दर ठरवुनच दिले असल्याने त्यास ३१ मार्च २०११ पर्यंत राबविण्यास व सदरील बचतगटांच्या प्रशिक्षणास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२२७ विषय क्रमांक- १०
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- लेखा
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.बाबु नायर
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.लेखा/३/कावि/१४२/२०१०
दि.१२/५/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

महाराष्ट्र शासन निर्णयान्वये पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. या दोन्ही संस्था एकत्र होऊन पी.एम.पी.एम.एल. या नावाने नवीन संस्था स्थापन झाली असुन शासन निर्णयानुसार मागील तीन वित्तीय वर्षात पीएमटी व पी.सी.एम.टी. दोन्ही महापालिकांनी खर्च भागविणे साठी जे अनुदान दिले असेल त्याची सरासरी काढून सरासरी एवढे अनुदान संबंधीत महापालिका कंपनीकडे वर्ग करेल असे कळविले

नुसार या मनपाने रक्कम अदा केलेली असून सदर तीन वर्षे कालावधीची मुदत दि.३१ मार्च, २०१० रोजी पुर्ण झाली असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मुदत पुर्ण झाल्याने परिवहन विभागास उचल या लेखाशिर्षावर कोणतीही तरतूद केलेली नसून तसे पी.एम.पी.एम.एल. यांना कळविण्यात देखील आलेले असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी एप्रिल २०१० चे वेतन अदा करणेसाठी र.रू.१ कोटी २७ लाख मिळणेकामी विनंती केली असल्याने वरील बाबी विचारात घेता पी.एम.पी.एम.एल. यांना रक्कम अदायगीबाबत निर्णय घेण्यात यावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याकामी पुर्व पिसीएमटीच्या कर्मचा-यांच्या संख्येप्रमाणे किंवा पिसीएमटीचे पीएमपीएमएल या कंपनीमधील शेअर प्रमाणे (हिश्याप्रमाणे) या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२२८ विषय क्रमांक- ११
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- अ प्रभाग
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/४६८/२०१० दि.१९/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-२०१० मधील अ.क्र.२ अन्वये, अ प्रभाग कार्यक्षेत्रातील विविध कार्यक्रमांसाठी (कालमर्यादित) तात्पुरत्या स्वरूपात ध्वनिक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप टेकोरेटर्स (नि.र.रू.९,३२,०३०/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार तीस] पेक्षा ७.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२२९ विषय क्रमांक- १२
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- उद्यान
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/१०/कावि/२०९/२०१० दि.२१/५/१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उद्यानांचे नाम, सुचना फलक अ)पत्रे बदलने ब)रंग काम करणे क)अक्षरांकीत करणे हे काम मे.एस.एस.कंन्स्ट्रशन, पिंपरी-१८. यांना १ % कमी दराने करारनामा न करता देणेस व येणाऱ्या र.रू.२५,७४०/- [र.रू.पंचवीस हजार सातशे चाळीस] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३० विषय क्रमांक- १३
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- वैद्यकिय
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/४६०/२०१० दि.२४/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.अनपटे प्रविण गोविंद यांना ARV अंतर्गत कामकाज व स्वाईन फ्ल्युचे कामकाजासाठी आदेशाचे दिनांकापासून सहा महिने कालावधीसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावर प्रतिमहा र.रू.८,०००/- [र.रू.आठ हजार] एकत्रित मानधनावर नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३१ विषय क्रमांक- १४
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- मध्यवर्ती भांडार विभाग
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/१८२/२०१० दि.२४/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

करारनम्यातील अट क्र.११ नुसार नि.सु.क्र.१४/१-०९/१० अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.श्री.पार्श्व सप्लायर्स, भोसरी यांचेकडून निविदेतील लघुत्तम दर A-३ साईजचे कागद प्रति रिम र.रू. २६०/- प्रमाणे १०० रिम वाढीव कागद खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या एकूण र.रू.२६,०००/- [र.रू.सव्वीस हजार] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३२ विषय क्रमांक- १५
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- वाय.सी.एम.एच
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/८अ/कावि/३२७/२०१० दि.२१/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मानधनावर विविध तज्ञ वैद्यकीय अधिकारी व टेक्निशियन्स यांच्या तात्पुरत्या स्वरूपात नेमणुका करणेकामी मुलाखतींमधुन पात्र झालेल्या उमेदवारांची प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निवडयादी तसेच प्रपत्र ब मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे प्रतिक्षा यादी करण्यात आलेली असून निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना आदेशाच्या दिनांकापासून ते दि.३०/९/१० या कालावधीकरता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दरमहा एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३३ विषय क्रमांक- १६
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- आरोग्य मुख्य
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जा.क्र.आमु/४/कावि/२११/ २०१० दि.२४/५/१०

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.सिटी गार्ड या एजन्सी मार्फत यांत्रिक पध्दतीने औषधे / किटकनाशके फवारणी करणेकामी मे.सिटी गार्ड यांचेकडून करारनामा करून घेऊन त्यांना कामाचा आदेश देणेत आला असून त्याकामी र.रू.३,६७,२००/- [र.रू.तीन लाख सदुसष्ट हजार दोनशे] खर्च करणेत आला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३४ विषय क्रमांक- १७
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- मुख्य लेखा परिक्षक
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/४८/२०१० दि.२४/५/१०

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील एप्रिल २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३५ विषय क्रमांक- १८
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/निविदा/कावि/२७९/२०१० दि.२६/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्वीक हील टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांचे Anti Virus Software बसविणेत आले असून त्यांनी एका लायसन्ससाठी र.रू.९७५/- प्र.नग (सर्व करांसहीत, एक वर्षासाठी व एक वर्षाचे नुतनीकरणासहीत) दर दिलेले असल्याने त्यांचेकडून १०० लायसन्स खरेदी करणेसाठी एकूण र.रू. ९७,५००/- एवढा खर्च येणार असल्याने प्राप्त परिस्थिती विचारात घेता सदरचे Anti Virus Software मे.क्वीक हील टेक्नॉलॉजी प्रा.ली. यांचेकडून थेट पध्दतीने खरेदी करण्यास व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३६ विषय क्रमांक- १९
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/४३२/२०१० दि.२५/५/०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.६६ मधील माणिक कॉलनी व्यायामशाळेतील मजल्याचे विद्युतीकरण वॉर्डस्तरीय योजनेतून करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्ड स्तरिय योजनेतून करण्यात येत असून मे.कमल इलेक्ट्रीक इन्टप्राझेस यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९८८/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे अठ्ठ्याऐंशी] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३७ विषय क्रमांक- २०
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/४३१/२०१० दि.२५/५/०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड येथील तालेरा रूग्णालयातील महिला वॉर्ड मधील विद्युतीकरणाची दुरुस्ती वॉर्ड स्तरिय योजनेतुन करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्ड स्तरिय योजनेतून करण्यात येत असून मे.विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू. ४९,९९३/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे त्र्यान्नव] पेक्षा १.२% कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३८ विषय क्रमांक- २१
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/४३०/२०१० दि.२५/५/०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५९ मधील गुरूव्दारा चौक ते सप्तश्रुगीनगरी या रस्त्यावर रस्ता रूंदीकरणातील सो.व्हे.पोल शिफ्ट करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्ड स्तरिय योजनेतून करण्यात येत असून मे.विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९८०/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे ऐंशी] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२३९ विषय क्रमांक- २२
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/४२९/२०१० दि.२५/५/०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५९ मधील नव्याने झालेल्या रस्त्यावर ठिकठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्ड स्तरिय योजनेतून करण्यात येत असून मे.कमल इलेक्ट्रीक इन्टरप्रयझेस यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९८०/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे ऐंशी] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२४० विषय क्रमांक- २३
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/७/२०२/१० दि.२६/५/०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१०-२०११ अन्वये, ब प्रभागाचे कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.६९ व ३५ मधील टेल्को कंपनी भिंत ते एम्पायर स्टेट न्यू बिल्डींग पर्यंत व ॲटोक्लस्टर मागील नाला तेथून ते मेन नाल्यापर्यंत तसेच वॉर्ड क्र.३३ खाणीपासून ते सोना रूपा बिल्डींग ते मुंबई पुणे रस्ता ते रेल्वे मोरीपासून डिलक्स चौक ते पवना नदीपर्यंत नाले साफ करून नाल्यातील निघालेला गाळ वाहतूक करून मोशी कचरा डेपो येथे टाकणे व पसरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू. ३,०७,८७२/- [र.रू.तीन लाख सात हजार आठशे बहात्तर] पेक्षा ३२.४० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक - ११२४१ विषय क्रमांक- २४
दिनांक- ८.०६.२०१० विभाग :- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/१०३/२०१० दि.२५/५/०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा प्रबोधिनी मधील खेळाडूंना विविध क्रीडा स्पर्धेस विविध ठिकाणी जाणेकामी अदा केलेल्या आगाऊ र.रू.१,१५,०००/- च्या खर्चास तसेच प्रत्यक्ष झ ाालेल्या र.रू.८४,०४९/- [र.रू. चौऱ्याऐंशी हजार एकोणपन्नास] च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०९/कावि/९०६/२०१०
दिनांक- १०/०६/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.